॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ ( ) १९३० मध्ये झालेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला स्वतंत्र राज्यघटना हवी आणि मतदानापासून वंचित असणाऱ्या वर्गांना मतदानाचा हक्क हवा अशी ठाम भूमिका मांडली व इंग्रज मंत्री परिषदेने या भूमिकेला सहमती दर्शवली. यावरुन बाबासाहेबांचे राजकीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान किती मोठे होते याची कल्पना येते असे प्रतिपादन सुप्रसिध्द नाटककार प्रा.दत्ता भगत यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त गुरुवारी विद्यापीठात प्रा.भगत यांचे `राजकीय स्वातंत्र्य चळवळीत बाबासाहेबांचे योगदान` या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.जे.बी.नाईक उपस्थित होते.

प्रा.भगत म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकर हे समाज सुधारक होते. त्यांचा स्वातंत्र्य चळवळीशी संबंध काय ? असा प्रश्न विचारला जातो. हा प्रश्न अज्ञानातून विचारला जातो. बाबासाहेबांनी सातत्याने राजकारणाविषयी मांडणी केली आहे. राजकारण आणि धर्म ही रथाची दोन चाके आहेत असे सांगणारे बाबासाहेब धर्म विरोधी नव्हते. केवळ जे तुरुंगात गेले, स्वातंत्र्य लढयात मृत्यूमुखी पडले, जखमी झाले त्यांचीच नावे स्वातंत्र्य लढयाच्या चळवळीबाबत घेतली जातात. वास्तविक बाबासाहेबांनी स्वातंत्र्याविषयीचे मुलभूत चिंतन केले होते. रुढ अर्थाने बाबासाहेब स्वातंत्र्य लढयात तुरुंगात गेले नाही. मात्र त्यांचा अभ्यासाचा विषय हा कायम त्या अनुषंगाने राहिलेला आहे. एम.ए शिकताना त्यांनी इस्ट इंडिया कंपनीच्या धोरणाचा अभ्यास केला आणि त्या कंपनीने आपल्या देशाचे आर्थिक शोषण कसे केले याची मांडणी केली.पीएच.डी.साठी देखील त्यांनी याच पध्दतीचा विषय घेतला होता. दुर्दैवाने स्वातंत्र्य चळवळ आणि बाबासाहेबांनी अभ्यासाला घेतलेले विषय यांची सांगड घातली जात नाही. स्वातंत्र्य लढयाच्या काळात त्यांनी बहुसंख्य शेतकरी हे शेत जमीनीचे मालक आहेत तर फक्त काही शेतकरी हे शेतकरी आहेत. ही बाब लक्षात आणून देताना शेतकरी या शब्दाला भूलू नका असे सांगितले होते. टाईम्स ऑफ इंडियामधील बाबासाहेबांचा लेख पाहून इंग्लडमधील भारत मंत्र्यांनी त्यांना भेटीसाठी पाचारण केले होते. देशाचे ऐक्य हवे असेल तर कोणालाही स्वतंत्र मतदार संघ देता कामा नये असे बाबासाहेबांनी १९१९ मध्ये सांगितले होते. पहिल्या गोलमेज परिषदेत भारतातील मोठे नेते उपस्थित नसताना बाबासाहेबांनी स्वतंत्र राज्यघटना आणि मतदानाचा सर्वांना हक्क याबद्दलची मागणी मान्य करुन घेतली. त्यानंतर महात्मा गांधी आणि बाबासाहेब यांची भेट झाली. गुलामीचे ओझे उतरवून फेकणाऱ्या बाबासाहेबांना राजकीय चळवळीतील महत्वाचा नेता मानले जाणार नसेल तर ते करंटेपण ठरेल असेही प्रा.दत्ता भगत म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाती-धर्माच्या पलिकडे बघितले जावे अशी अपेक्षा व्यक्त करुन संशोधकांनी या महापुरुषांच्या दुर्लक्षित झालेल्या पैलूंवर संशोधन करावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले. विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ.अनिल डोंगरे यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 6 डिसेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत बुधवार, दि.५ डिसेंबर रोजी `ओपन डे ` चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रशाळेतील परिक्षार्थी विद्यार्थ्यांना त्यांच्या तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका थेट हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अभिनव कल्पनेतून गेल्या दोन वर्षांपासून थेट उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात देवून त्यांच्या शंकांचे निरसन करणारा ओपन डे हा प्रयोग विविध प्रशाळांमध्ये राबविण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. संगणकशास्त्र विभागात एम.एस्सी. (संगणकशास्त्र), एम.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान) आणि एम.सी.ए या तीनही वर्गांच्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी १३ ते ३० नोव्हेंबर दरम्यान परीक्षा दिली होती. या परीक्षांमध्ये तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी ओपन डे चे आयोजन करण्यात आले होते. या ओपन डे च्या दिवशी प्रत्यक्ष कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून झालेल्या चुकांमधून विद्यार्थ्यांनी बोध घ्यावा व पुढील परीक्षांसाठी चांगली तयारी करावी असा सल्ला दिला. २०० विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तरपत्रिकांचे अवलोकन केले व लिहिलेली उत्तरपत्रिका वाचताना ती अधिक चांगली लिहिता आली असती याची जाणीव झाल्याचे मत व्यक्त केले. प्रशाळेचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परीक्षा समितीचे समन्वयक प्रा.एस.व्ही.कापसे यांनी या उपक्रमाचे नियोजन केले होते.

---

जा.क्रं. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : ६ डिसेंबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत /-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी